सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व.का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक २५/०३/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पोलीस ३११८/ प्र.क्र. १०९/ पोल-५अ, दि. २४/०३/२०२५.

**विषय :-** पोलीस विभागाच्या विविध आस्थापनांवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पोलीस ३११८/ प्र.क्र. १०९/ पोल-५अ, दि. २४/०३/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०३२४१७२९५४८०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 25-03-2025 22:08:37

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय खंडाळा, जि.पुणे/ जालना/ अकोला/ नागपूर/ नानवीज दौंड/ मरोळ,मुंबई/ सोलापूर/ बाभळगाव, जि. लातूर
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का क्र.२६-ब

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस विभागाच्या विविध आस्थापनांवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस ३११८/प्र.क.१०९/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २४ मार्च २०२५

**वाचा :-**

१) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-पोलीस-३११८/प्र.क्र.१०९/पोल ५अ, दि.०१.१०.२०२४
२) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२६-ब/६१४३/सपोनि-पोना/०३/२००३, दि.०६.०३.२०२५
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक- पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०३.०३.२०२५,

**शासन निर्णयः-**

पोलीस शिपायांच्या एकूण मंजूर पदांपैकी १५,००० पदांची श्रेणीवाढ करुन पोलीस नाईक ही पदे निर्माण करण्याचा तसेच पोलीस उपनिरीक्षकांच्या एकूण मंजूर पदांपैकी १५०० पदांची श्रेणीवाढ करुन सहाय्यक पोलीस निरीक्षक ही पदे निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला व त्याप्रमाणे सदर पदे दिनांक ०१.११.१९९२ पासून निर्माण करण्यात आलेली आहेत. सदर पदांना संदर्भ क्र.१ येथील दि.०१.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०९.२०२४ ते दिनांक दि.२८.०२.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

२. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांनी संदर्भ क्र. २ येथील दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस नाईक संवर्गाच्या १५००० व सहायक पोलीस निरीक्षक संवर्गाच्या १५०० अस्थायी पदांना दिनांक दि.०१.०३.२०२५ पासून पुढे मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार सदरहू पोलीस नाईक संवर्गाच्या १५००० व सहायक पोलीस निरीक्षक संवर्गाच्या १५०० अस्थायी पदांना **दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५** या कालावधीकरिता खालील अटींच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देत आहे :-

**अटी :-**

१) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि. ०३.०३.२०२५ नुसार विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

३) पोलीस नाईक संवर्गातील अंमलदार यांना पोलीस हवालदार पदावर पदोन्नती दिल्यानंतर पोलीस नाईक संवर्गातील जेवढी पदे रिक्त होतील तेवढी पदे व्यपगत करण्यात यावीत.

३. यावरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

१) "२०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस दल - (००)(०१) जिल्हा पोलीस बल. "
२) "२०५५-पोलीस-००१-संचालन व प्रशासन -(००) (०१) पोलीस निरीक्षणालय."
३) "२०५५-पोलीस-१०१-गुन्हा अन्वेषण व दक्षता-(००) (०१) गुन्हा अन्वेषण विभाग."
४) "२०५५-पोलीस-००३-शिक्षण व प्रशिक्षण (००) (०१)-पोलीस प्रशिक्षण विद्यालय."
५) "२०५५-पोलीस-१०१-गुन्हा अन्वेषण व दक्षता (००)(०३) लाचलुचपत विरोधी केंद्र ."
६) "२०५५-१११- रेल्वे पोलीस (००)(०३) रेल्वे पोलीस."
७) "२०५५-१०८-राज्य मुख्यालय पोलीस (०२) (०१) शहर पोलीस."
८) "२०५५-पोलीस १०५-सीमा सुरक्षा दल (००) (०१) सीमा सुरक्षा दल."
९) "२०५५-पोलीस ११२-बंदर पोलीस (००)(०१) नदी, बंदर व सागरी पोलीस"
१०) "२०७०-इतर प्रशासनिक सेवा."

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.३ येथील वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि.०३.०३.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३२४१७२९५४८०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.03.24 17:30:45 +05'30'

**( सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, अँटी करप्शान ब्युरो, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग (गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
७. प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय खंडाळा, जि.पुणे/ जालना/ अकोला/ नागपूर/ नानवीज दौंड/ मरोळ, मुंबई/ सोलापूर/ बाभळगाव, जि.लातूर
८. प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
९. सर्व पोलीस आयुक्त.
१०.सर्व पोलीस अधीक्षक.
११.सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
१२.महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर
१४.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६.निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१७.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तीय सुधारणा-१/आपुक
१८. निवडनस्ती (पोल-५अ)